भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १९६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १६/०४/२०१८

**१) अल्पवयीन मुलीचा विनयभंग करण्याचा प्रयत्न करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक १०/०४/२०१८ चे १०.१५ वाजता दरम्यान यातील अल्पवयीन पिडीत फिर्यादी ही तिचे लहान बहीनीसह गावाकडे जात असता आरोपी याने तिला वाटेत अडवुन त्याच्या जवळचा मोबाईल देण्याचा प्रयत्न करून तिचे सोबत चोरून जवळीक साधण्याचा प्रयत्न केला सदर प्रकरण बाबत फिर्यादीचे आई— वडीलांनी जाब विचारले असता, आरोपी याने त्यांना देखील शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने, अल्पवयीन पिडीत फिर्यादी हिचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३५४,(ड)(१)(आय),३४१,५०४,५०६ भादवी. सहकलम ८,१२,२(१)(ड)लै.गु.बा.सं.कायदा २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोउपनी. डहाके पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.आरोपी अटक आहे.

**२) अल्वयीन मुलीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक १४/०४/२०१८ चे २०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती रॅली मध्ये नाचत असतांना आरोपीने फिर्यादीचे केस ओढुन तिला रॅली बाहेर नेवुन तिचा विनयभंग केला व आरोपी हा मागील १ महिन्या पासुन फिर्यादीचा पाठलाग करीत असल्याने, फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३५४(ड) भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोउपनी. मेसरे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) झोपडीला आग लावुन नुकसान केल्याने गुन्हा नोद:—**

दिनांक १३/०४/२०१८ चे २१.०० ते २२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचे झोपडीला कोणीतरी अज्ञात आरोपीने अज्ञात वस्तुने आग लावुन आगळीक करून फिर्यादीचे अंदाजे ५,३००/रु. चे नुकसान केल्याने फिर्यादी अनिल ताराचंद मालाधरे वय ४४ वर्ष रा. राजापुर यांचे तोडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ४३६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. राऊत पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**४) घरातील चांदीची चाळ, ईलेक्ट्रीक सामान व सुटे पैश्याची चोरी :—**

दिनांक २५/०३/२०१८ ते दि. १४/०४/२०१८ चे १५.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी दि. २५/०३/२०१८ ते १४/०४/२०१८ चे १५.०० वाजता पर्यंत राहते घरी ताला लावुन पत्नीकडे नागभीड जि. चंद्रपुर येथे गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने समोरील दाराचा कोंडा तोडुन आत प्रवेश करून ६ तोळे चांदीची चाळ कि. ३,०००/रु. पुजेचे पैसे ३.०००/रु. आलमारीतील सुट्टे पैसे ५,०००/रु. २ टेबल फॅन कि.३,०००/रु. इंनव्हटर कि. १०,०००/रु. आस एकुण २४,०००/रु चा माल चोरून नेल्याने दि. १५/०४/२०१८ ला फिर्यादी ओमप्रकाश किशनजी लांजेवार ४६ वर्ष रा. नाशिक नगर रोड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोगे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) मोटार पंपची चोरी:—**

दिनांक १४+१५/०४/२०१८ चे रात्रदरम्यान यातील फिर्यादी सुरेश केशव सार्वे वय ४९ वर्ष रा. मुंढरी बुज याचे शेतावरील विहीरीवर असलेली बुल्बी कंपनीची मोटार पंप ३ एचपी किमती १०,०००/रु ची लावलेली होती परंतु अज्ञात चोराने चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन करडी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कटरे पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

**६) ऑटोच्या धडकेत एक जखमी:—**

दिनांक ०९/०४/२०१८ चे ०६.४५ दरम्यान यातील फिर्यादी रामकीशन कोदु तिबुडे वय ५५ वर्ष रा. शास्त्री नगर भंडारा हा त्याचे मोटार सायकलने कोथुर्णा ते तिरोडा मार्गाने जात असतांना समोरून येणा—या यातील आरोपी ऑटो चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे गाडीस धडक देवुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे बयान व डॉ. मेमो वरून व चौकशी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २७९,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. ऊके पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**७) मोटार सायकच्या धडकेत एक जखमी:—**

दिनांक १४/०४/२०१८ चे २१.४५ दरम्यान यातील फिर्यादी प्रभु डोमाजी बावणकर वय ६० वर्ष रा. सुभाष वार्ड आंबाळी याचा जखमी मुलगा महेश प्रभु बावणकर वय २१ वर्ष रा. आंबाळी हा त्याचे मोटार सायकलने भंडारा येथे जेवन वाढण्याचे कामाला जात असतांनी यातील आरोपी चालकोने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ला धडक मारून त्यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे तोंडी व जखमीचे एमएलसी, डॉ. मेमो वरून रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**८) भांडण करून मारहान करून दुखापत केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १५/०४/२०१८ चे १९.०० दरम्यान यातील फिर्यादीचा बहिन लेक रजत युवराज भालाधरे याने आरोपीस पेंटीगचे कामाचे पैसे मागितले असता आरोपीने त्याचे सोबत भांडण करून मारपीट करीत असता, यातील फिर्यादी जखमीने मध्यस्ती केली असता तिला धक्का देवुन खाली पाडुन उजवे हाताचे भुजेवर लाथ मारून दुखापत केल्याने जखमीचे बयान व डॉ. एमएलसी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२५ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत

**९) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १५/०४/२०१८ चे १७.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मिनीडोर वाहन ही अडयाळ बसस्थानक येथे आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. बोरकर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बोरकर पोलीस स्टेशन अडयाळ करीत आहेत.

**१०) अवैध दारु /जुगार अडड्यांवर धाडी . :—**

दिनांक १५/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन मोहाडी, सिहोरा, गोबरवाही, लाखांदुर व कारधा येथे अवैध हातभट्टी +देशी दारू /जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४५ लिटर हातभट्टी दारू किंमती ३,१००/रु. व १ लिटर ८०० मिली लिटर देशी दारु किंमती ५२०/—रु. तसेच जुगारातुन ५६०/रु. असा एकुण किंमती ४,१८०/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

**११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक १५/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १५१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवाशी — १४ तीन सिटर वाहनाकरीता— १० ईतर वाहनांवरती — १२७ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
महिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.